महाराष्ट्र टाइम्स

# ‘मुंबईला पूर्वपदावर आणण्याची तयारी हवी’

Updated: 14 Aug 2020, 02:30:00 PM

**करोना संकट व लॉकडाउननंतर 'पुनश्च हरिओम:' प्रक्रिया सुरू झाली आहेएकेक क्षेत्र . .पण मुंबई अपेक्षेनुरूप पूर्वपदावर आलेली नाही .पूर्वपदावर येणे अपेक्षित आहे**



म. टा. प्रतिनिधी, मुंबई

करोना संकट व लॉकडाउननंतर 'पुन:श्च हरिओम' प्रक्रिया सुरू झाली आहे. एकेक क्षेत्र पूर्वपदावर येणे अपेक्षित आहे. पण मुंबई अपेक्षेनुरूप पूर्वपदावर आलेली नाही. करोना संकटातून बाहेर पडताना शहरातील ऊर्जेचा वापर करता येईल. त्यादृष्टीने प्रशासनासह उद्योजकांनीही तयारी करावी, असे मत प्रजा फाऊंडेशनने आयोजित केलेल्या वेबिनारमध्ये व्यक्त करण्यात आले.

प्रजा फाऊंडेशनने 'रीफोकस मुंबई' नावाचा वेबिनार आयोजित केला होता. यात निताई मेहता, अनूज भगवती, देवल संघवी व समीर सोमैय्या हे सहभागी झाले होते तर आयरीस मदैरा यांनी सूत्रसंचालन केले.

'शेअर बाजार, लहान-मोठे उद्योग, मोठ्या कंपन्यांची मुख्यालये आणि बॉलिवूडपासून सारे काही आहे. हे शहर अखंडपणे धावत असते. ती ऊर्जा शहराला पूर्वपदावर आणताना उपयोगात आणावी. त्यातूनच करोना पश्चात हे शहर पुन्हा उभे राहील', असे मत वक्त्यांनी मांडले.

'मुंबईच्या अनेक भागांत पाणी व मल:निस्सरणाची योग्य सोय नाही. प्रत्येक पावसात मुंबई पाण्याखाली जाते. पूरस्थिती थांबविण्याच्या विशेष उपययोजना जोमाने सुरू कराव्यात. प्रशासकीय कामे सुरळीत व्हावीत. यातूनच हे शहर पूर्वपदावर येऊ शकेल. एकूणच नागरीकपूरक व भीतीमुक्त अशी मुंबई व्हायला हवी', असेही मत मांडण्यात आले.

Link:- https://maharashtratimes.com/maharashtra/mumbai-news/mumbai-needs-to-be-prepared-to-be-restored/articleshow/77530416.cms